# चिटणिसाची कार्यपद्धती

## इयत्ता अकरावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २०.६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# चिटणिसाची कार्यपद्धती

## इयत्ता : अकरावी

२०१९

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.

G3I5Y3

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : 2019
दुसरे पुनर्मुद्रण : 2021

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे - ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**समिती सदस्य**

डॉ. ज्योती गायकवाड (अध्यक्ष)
डॉ. मुकुंद तापकीर (सदस्य)
डॉ. प्रशांत साठे (सदस्य)
श्री. मोहन साळवी (सदस्य)
श्री. सुरेंद्र निरगुडे (सदस्य)
श्री. महेश आठवले (सदस्य)
श्रीमती अनंतलक्ष्मी कैलासन (सदस्य)
श्री. नारायण पाटील (सदस्य)
श्रीमती लक्ष्मी पिल्लई (सदस्य)
श्रीमती मृणाल फडके (सदस्य)
श्रीमती उज्ज्वला गोडबोले (सदस्य-सचिव)

**अभ्यास गट**

**सदस्य**

श्रीमती झुबेदा सुरती
श्री. विजय खुडे
श्री. अशोक गडदरे
श्री. ओंकार प्रसादे
श्री. गोविंद हरे
श्रीमती लक्ष्मी पिल्लई
श्री. नितीन गुजराथी
श्रीमती मंजुषा गोंगले
श्री. प्रशांत शेळके
श्रीमती नयना पदकी

**भाषांतरकार :**

श्री. प्रशांत शेळके
श्रीमती नयना पदकी
श्री. ओंकार प्रसादे
श्री. गोविंद हरे
श्री. विजय खुडे

**समीक्षक**

डॉ. ज्योती गायकवाड

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. संदिप कोळी, चित्रकार, मुंबई

**अक्षरजुळणी**

श्री. प्रिंटर्स, पुणे.

**समन्वयक**

**उज्ज्वला श्रीकांत गोडबोले**
प्र. विशेषाधिकारी गणित,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

**सच्चितानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी
**संजय कांबळे**
निर्मिती अधिकारी
**प्रशांत हरणे**
सहायक निर्मिती अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

N/PB/2021-22/20,000

**मुद्रक**

HEXAGON PRINT & PACK PVT. LTD., PALGHAR

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून इयत्ता ११ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार तयार केलेले पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे.

वाणिज्य शाखेचा विद्यार्थी व्यवसाय, व्यवसाय संस्था, व्यवसायाचे व्यवस्थापन, अर्थशास्त्र, वित्तीय लेखाशास्त्र इत्यादी घटकांचा अभ्यास विविध विषयांमधून करत असतो. चिटणिसाची कार्यपद्धती हा यापैकीच एक विषय जो व्यवसाय संघटनांच्या सर्वांत प्रसिद्ध आणि मोठ्या घटकाशी निगडित आहे, तो संघटना प्रकार म्हणजे संयुक्त भांडवली संस्था. या विषयामध्ये विद्यार्थी फक्त संयुक्त भांडवली संस्था, तिचे कार्य, व्यवस्थापन इत्यादी बाबी शिकणार नसून त्याचबरोबर तो कंपनी चिटणिसाची भूमिका आणि महत्त्व, कायदेशीर बाबींचे अनुपालन करणारा अधिकारी आणि कंपनी चिटणिसाचे संप्रेषण कौशल्य इत्यादी गोष्टी शिकणार आहे.

कंपनी कायद्यातील कायदेशीर आणि तांत्रिक घटक विद्यार्थ्यांना सहजरित्या आत्मसात करता यावेत यासाठी पुस्तकातील तपशील साध्या, सोप्या भाषेत मांडण्याची विशेष काळजी घेण्यात आली आहे. आवश्यक तेथे तक्ते व आकृत्यांचा आधार घेण्यात आला आहे. संज्ञा, संकल्पना आणि कठीण शब्दांचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. पुस्तकातील मजकूर अतिरिक्त माहिती आणि कृतींनी रंजक बनवला आहे. प्रत्येक पाठाच्या शेवटी स्वाध्याय देण्यात आला आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांना विविध संकल्पना स्पष्ट झाल्या आहेत हे तपासण्यासाठी विविध प्रकारचे प्रश्न विचारले आहेत. उपयोजनात्मक प्रश्नांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विश्लेषण करण्याची व त्यांची मते मांडण्याची संधी देण्यात आली आहे. प्रत्येक धड्याच्या शेवटी क्यूआर कोड देण्यात आला आहे, ज्याच्या माध्यमातून विविध अर्जांचे नमुने, कागदपत्रे, लिंक्स, कागदपत्रांचे नमुने इत्यादींबाबत विद्यार्थी अधिक माहिती मिळवतील ज्यामुळे संकल्पना स्पष्ट होण्यास अधिक मदत होईल.

कंपनी कायदा २०१३ मध्ये अनेक नवीन बदल करण्यात आले, नवीन संकल्पना निर्माण झाल्या, कंपनी कायद्यामध्ये काही दुरुस्त्या करण्यात आल्या. या पुस्तकात कंपनी कायदा २०१३ तसेच नियम आणि नियमावलीत डिसेंबर २०१८ पर्यंत जे बदल करण्यात आले त्यांचा समावेश करण्यात आला आहे. निश्चित केलेला अभ्यासक्रम व तो अभ्यासणारे विद्यार्थी विचारात घेता कंपनी कायदा २०१३ मधील एकूण एक तरतुदी समाविष्ट केलेल्या नाहीत. विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदींची व कंपनी चिटणिसाच्या कार्यपद्धतीची ओळख होईल.

या पुस्तकाचे समिती सदस्य, अभ्यास गट सदस्य, समीक्षक, गुणवत्ता परीक्षक या सर्वांचे आभार.

विद्यार्थी, शिक्षक आणि विषयतज्ज्ञ या पुस्तकाचे स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

(डॉ. सुनिल मगर)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक** : २० जून २०१९,
भारतीय सौर : ३० ज्येष्ठ १९४१.

## क्षमता विधाने

| घटक क्रमांक | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| १. | चिटणीस | • 'चिटणीस' संकल्पना समजणे.<br>• चिटणिसाचे महत्त्व व चिटणिसाचे प्रकार समजणे.<br>• चिटणिसास आवश्यक गुण, पात्रता, कौशल्ये ज्ञात होणे. |
| २. | संयुक्त भांडवली संस्था (कंपनी) | • व्यावसायिक संघटनांची उत्क्रांती समजणे.<br>• संयुक्त भांडवली संस्थेचा अर्थ, वैशिष्ट्ये व प्रकार यांचे आकलन होणे.<br>• विविध व्यवसाय संघटना प्रकारांची तुलना करणे. |
| ३. | कंपनी स्थापना व स्थापनेसंबंधी दस्तऐवज | • कंपनी स्थापनेची प्रक्रिया अवगत होणे.<br>• कंपनी स्थापनेसंबंधित विविध दस्तऐवज – घटनापत्रक, नियमावली, माहितीपत्रक इ. समजणे.<br>• घटनापत्रक व नियमावली याची तुलना करणे. |
| ४. | कंपनीचे सभासद, संचालक आणि मुख्य व्यवस्थापकीय कर्मचारी | • भागधारक, सभासद या संकल्पना, सभासदांचे अधिकार समजणे.<br>• सभासदत्व मिळविणे, सभासदत्व संपुष्टात येणे याचे मार्ग व कारणे अवगत होणे.<br>• संचालक मंडळ, व्यवस्थापकीय संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी मुख्य वित्त अधिकारी, कंपनी चिटणीस यांची भूमिका, महत्त्व व कर्तव्ये यांचे आकलन होणे. |
| ५. | कंपनीच्या सभा | • सभा–अर्थ, गरज, कंपनी सभेसंबंधी तरतुदी समजणे.<br>• कंपनी सभेचे प्रकार, कायदेशीर तरतुदींचे आकलन होणे.<br>• कंपनी चिटणिसाची वार्षिक सर्वसाधारण सभेसंबंधी कार्ये विशद करणे. |
| ६. | चिटणिसाची व्यावसायिक संप्रेषण कौशल्ये | • व्यावसायिक संप्रेषणाचे प्रकार, व्यावसायिक पत्राचे महत्त्व, रचना व आवश्यक बाबी समजणे.<br>• संचालकांशी पत्रव्यवहाराचे प्रसंग समजणे व पत्र लिहिणे.<br>• बँकेशी, वैधानिक अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहाराचे प्रसंग समजणे व पत्र लिहिणे. |

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | चिटणीस | १ |
| २. | संयुक्त भांडवली संस्था | १५ |
| ३. | कंपनीची स्थापना | ३२ |
| ४. | कंपनी स्थापनेसंबंधित दस्तऐवज | ४४ |
| ५. | कंपनीचे सभासद | ६१ |
| ६. | कंपनीचे संचालक व मुख्य व्यवस्थापकीय कर्मचारी | ७० |
| ७. | कंपनीच्या सभा – भाग १ | ९५ |
| ८. | कंपनीच्या सभा – भाग २ | ११३ |
| ९. | चिटणिसाचे व्यावसायिक संप्रेषण कौशल्य | १२५ |
| १०. | संचालकांशी पत्रव्यवहार | १३८ |
| ११. | बँकांशी पत्रव्यवहार | १४६ |
| १२. | वैधानिक अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार | १५८ |
| | उत्तर सूची | १७० |